**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव**

**जिल्हा पेठ,जिल्हा सामान्य रुग्णालय आवार,जळगांव**

**जाहिरात**

दि.१५/१२/२०२३

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पांडे चौक, जिल्हा पेठ परिसर, जळगांव येथे एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमास प्रवेशित ७५० विद्यार्थ्यांकरिता (मुले व मुली) यांना राहण्यासाठी विद्युत, पाणी व वाहनाकरीता पार्किंगची व्यवस्था इत्यादि. सर्व सोई उपलब्ध असलेल्या व महाविद्यालयापासुन जवळ असलेले तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव यांनी निर्धारित केलेल्या भाडयाप्रमाणे ११ महिणे व आवश्यक असल्यास वाढीव कालावधी करिता करारतत्वावर इमारत भाडयाने घेणे आहे.

उक्त नमुद केल्या प्रमाणे नियमावलीत असलेल्या व भाडेतत्वावर देण्यास इच्छुक असलेल्या इमारत मालकांनी अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांसह (जागेचा उतारा, कामपूर्णत्वाचा दाखला, मंजूर प्लॅन, इमारतीचे फोटो, विद्युत देयकाची प्रत इत्यादी) या कार्यालयामध्ये दि.१५/०१/२०२४ रोजी पर्यंत सायंकाळी ०६.१५ वाजेपर्यंत सादर करावा. सदरील भाडेतत्वावरील इमारत उपलब्ध करुन देण्यासंबंधी अटी व शर्ती इ.बाबतची सविस्तर माहिती खालील प्रमाणे :- **अटी व शर्ती**

- सदरील इमारती मध्ये नियमित पुरेशा प्रमाणात शुध्द पिण्याचे व वापराण्याचे पाणी असावे.
- विद्युत पुरवठाची पूर्ण व्यवस्था असावी.
- इमारतीच्या समोर पार्किंगसाठी पुरेशी जागा असावी.
- इमारत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा पेठ, जळगांव पासुन शक्य तितक्या जवळ असावी.
- इमारत ११ महिणे व त्यानंतर आवश्यक असल्यास वाढीव कालावधीकरिता कारराने भाडेतत्वावर घेण्यात येईल.
- पाणीपटटी, घरपटटी व इतर अनुषंगीक कर भरण्याची जबाबदारी हि इमारत मालकाची राहिल.
- इमारत ताब्यात घेतल्याच्या दिनांकपासून ताब्यात असलेल्या खोल्यामधील विद्युत वापराच्या देयकाची भरणा या संस्थेकडून करण्यात येईल.
- इमारतीचे बांधकाम १५ वर्षापुर्वीचे नसावे.
- वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने इमारत पुर्णता सुरक्षित, संरचानात्मक परिक्षण व अग्नि प्रतिबंधक उपाययोजना केलेली असावी.
- इमारतीचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित/निश्चित केल्याप्रमाणे शासकीय नियमानुसार अदा करण्यात येईल.
- इमारतीमध्ये किमान ८० विद्यार्थ्यी क्षमता असणे आवश्यक आहे.
- इमारतीमध्ये लहान व मोठी दुरुस्तीचे कामे तसेच नुतनीकरण करण्याची जबाबदारी इमारत मालकाची राहिल व त्याकरिताचा खर्च इमारत मालकास स्वतः करावा लागेल व त्याची प्रतिपूर्ती या कार्यालयाकडून होणार नाही
- इमारतीचे भाडे शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतरच इमारत मालकास अदा करण्यात येईल.
- संस्थास्तरावर गठित केलेल्या समितीद्वारे इमारतीची संपूर्ण पाहणी करुन समितीच्या अहवालानुसार इमारत भाडयाने घेण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

- **इमारत भाडयाने घेण्या संबंधीचे आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबित ठेवण्याचे अथवा कोणत्याही वेळी आदेश रद्य करण्याचे तसेच जाहिरात रद्य करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी स्वतःकडे राखुन ठेवलेले आहे**

**(डॉ. गिरीष ठाकूर)**
**अधिष्ठाता**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव**